९२८७/१२२

**कायम विनाअनुदान तत्वावर**
**(माध्यम इंग्रजी)**

जाक्र. प्राशि-३/खाप्राशा/मा.इंग्रजी/११-१२
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 7 APR 2012

(2)

प्रति

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

२. शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,

विषय : सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात परवानगी मिळालेल्या नविन खाजगी प्राथमिक शाळेस सन २००८-२००९ या शैक्षणिक वर्षापासून नुतनीकरणाने परवानगी देणेबाबत. . .

संदर्भ : १. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक व्हीएसएल १००३/(५०९/२००३)/प्राशि ३ दिनांक २४ जून २००३
(1) २. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र.माशानु २००७/(१००१/०७)/ माशि १. दिनांक १९ ऑक्टोबर २००७
३. या कार्यालयाचे पत्र क्र.प्रा.प्राशि ३/खाप्राशा/मान्यता/पुवि/ १७२२४-२७ दिनांक १५/७/२००३
४. आपले पत्र क्र. जि.प./शिक्षण/प्राथ./खाप्राशा/२३७/११ दिनांक २७/३/२०१२

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भ क्र.३ चे पत्र कृपया पहावे.

याबावत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमासाठी सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षामध्ये शाळेस परवानगी देण्यात आलेली आहे. तथापी संबधीत संस्थेने सदर शैक्षणिक वर्षात शाळा सुरु न करता सदरची शाळा सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षामध्ये सुरु केलेली असून सदर शाळेस नूतनीकरणाने परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.४ चे पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. सदर प्राप्त प्रस्तावानूसार सदर संस्थेच्या शाळेस संदर्भ क्र. २ अन्वये नविन प्राथमिक शाळा सुरु करण्याच्या परवानगीचे नुतनीकरण करुन जून,२००८ पासून इ. १ ली च्या वर्गास शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर **कायम विनाअनुदान तत्वावर** परवानगी देण्यात येत आहे. इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४ | ५. | ६ |
| १. | सारथी शिक्षण प्रसारक मंडळ, खराडी, पुणे १४. | नुतन इंग्लिश मेडियम स्कूल, केशवनगर, मुंढवा, पुणे ३६. | १ ली | इंग्रजी | जून २००८ पासून |

- **सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.**

३.१ सदर संस्था,नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

Head Master
Dnyandeep English Medium Schoc
Keshvnagar, Mundhwa, Pune-36

Scanned with OKEN Scanner